महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

क्र.साप्रवि/रवका/न.क्र.३४८/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ३२५ दिनांक २३ / १२ / २०१०

विषय : ध्वजदिन निधी संकलन - २०१०.

संदर्भ : कक्ष अधिकारी, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. संकीर्ण-८१०/प्र.क्र.४२५/प्रशा-४ दि.०७ डिसेंबर २०१०.

.....

ध्वजदिन निधी संकलन - २०१० या संदर्भात योग्य ते निर्देश कक्ष अधिकारी, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. संकीर्ण-८१०/प्र.क्र.४२५/प्रशा-४ दि.०७ डिसेंबर २०१० सोबत जोडलेल्या श्री.जे.पी.डांगे, मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे अर्ध शासकीय पत्र क्र.मासैध्व-२०१०/१३०७/ प्र.क्र.३३०/१०/२८ दिनांक १ डिसेंबर २०१० च्या पत्रामध्ये देण्यात आले असून सदर पत्रांच्या प्रती या साबत जोडण्यात आल्या आहेत.

२. क्षेत्रीय व निगम कार्यालयातील सर्व संबंधीत संवितरण अधिकाऱ्यांनी सदर अर्धशासकीय पत्राचे अवलोकन करावे व त्यातील सूचना/निर्देशाचे काटेकोरपणे पालन करून नमूद उद्दीष्टानुसार ध्वजदिन निधी संकलीत करावा. सदर ध्वजदिन निधीत द्यावयाचे योगदान हे जिल्हा स्तरावर जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांच्या कार्यालयात "जिल्हाधिकारी व अध्यक्ष, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय" यांच्या नावाने धनादेशाद्वारे जमा करण्यात यावे.

३. सदर प्रशासकीय परिपत्रक www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

सोबत : वरील प्रमाणे.

23/12/2010
(विजय भि. बागुल)
मुख्य महाव्यवस्थापक (क)

प्रति,
प्रेषण यादीप्रमाणे विभागीय कार्यालय स्तरापर्यंत व
निगम कार्यालयातील सर्व विभागप्रमुख व कक्ष प्रमुख

*D:\O&M\Adm.Cir - F.N.348-Dhavjadin Nidhi.doc*
*23/12/2010*

मध्यवर्ती नोंदणी विभाग
आवक क्र. 2485
दिनांक 13/12/10

का.सं. / मा.सं/ 895
दिनांक 16/12/10

**अतितात्काळ**

दूरध्वनी क्रमांक :२२०२ ५४४३
फॅक्स क्रमांक :२२०४ ५९६०

MD/D/6342
13/12/10

क्रमांक:-संकीर्ण-०८१०/प्र.क्र.४२५/प्रशासन-४
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ७ डिसेंबर,२०१०.

मुख्य महाव्यवस्थापक (कर)
G-120
16-12-10
म.रा.वि.वि. कं. लि. मुंबई

प्रति,

विकास आयुक्त,उद्योग संचालनालय,मुंबई.
संचालक, शासकीय मुद्रण ,लेखन सामग्री प्रकाशन संचालनालय,मुंबई.
कामगार आयुक्त,मुंबई.
कल्याण आयुक्त, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, मुंबई.
संचालक,औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, ताडदेव, मुंबई.
संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई.
संचालक, श्रम विज्ञान संस्था, मुंबई.
प्रबंधक,औद्योगिक न्यायालये, मुंबई.
मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, पेट्रोकेमिकल्स महामंडळ मर्यादित, मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य लघु उद्योग महामंडळ, मुंबई.
मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामाद्योग मंडळ, मुंबई
मुख्य अभियंता, (विद्युत), सा.बां.विभाग, मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत धारक कंपनी लिमिटेड, मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य ऊर्जा नियामक आयोग, मुंबई.
संचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पूणे.
संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी, मुंबई
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पारेषण कंपनी,मुंबई
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वितरण कंपनी,मुंबई
व्यवस्थापकीय संचालक, कोकण विकास महामंडळ मर्यादित, मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे,
व्यवस्थापकीय संचालक, मराठवाडा महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, औरंगाबाद.
व्यवस्थापकीय संचालक, विदर्भ विकास महामंडळ मर्यादित, नागपूर.

विषयः- **ध्वजदिन निधी संकलन-२०१०**

महोदय/ महोदया,

उपरोक्त विषयावरील मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे अ.शा.पत्र क्र. मासैध्व - २०१०/ १३०७/ प्र.क्र.३३०/१०/२८, दि.१ डिसेंबर, २०१० ची प्रत सोबत जोडली आहे.

D:\PAWASKAR\425 10\3

२.	कृपया सदर पत्रात नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी ही विनंती.

आपला,

(य.टे.पाडवी)
कक्ष अधिकारी

D:\PAWASKAR\425 10\4

अर्ध शासकीय पत्र क्र.मासैध्व-२०१०/१३०७/प्र.क्र. ३३०/१०/२८
दिनांक - १ डिसेंबर, २०१०

महाराष्ट्र
शासन

जे. पी. डांगे
मुख्य सचिव

**विषय:- <u>ध्वजदिन निधी संकलन - २०१०</u>**

प्रिय श्री.

माजी सैनिकांच्या पुनर्वसनाच्या विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी दरवर्षी ७ डिसेंबर रोजी सैन्यदलाचा ध्वजदिन साजरा करण्यात येतो. त्यानिमित्ताने ७ डिसेंबर पासून पुढील एका वर्षात निधी गोळा करण्याचा कार्यक्रम चालू असतो. राष्ट्र संरक्षणासाठी ज्यांनी आपले प्राणार्पण केले आहेत, त्यांच्या कुटुंबियांच्या, त्याचप्रमाणे युध्दात अपंगत्व प्राप्त झालेल्या आणि सशस्त्र दलातून निवृत्त झालेल्या जवानांच्या आणि राज्यात वेळोवेळी आलेल्या नैसर्गिक आपत्तींना तोंड देण्यासाठी धावून येणा-या जवानांच्या विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी निधीची आवश्यकता असते. हा निधी गोळा करण्यासाठी निश्चित केलेल्या उद्दीष्टांच्या ७५ टक्के इतका निधी पुढील वर्षाच्या मे महिन्यापर्यंत आणि ९० टक्के निधी ऑगस्ट महिन्यापर्यंत गोळा करावा असे अपेक्षित असते. सन २०१०-२०११ साठी या निधीत अठरा कोटी रूपये गोळा करण्याचे उद्दीष्ट ठरविले आहे.

२. गत वर्षी ध्वजदिन निधी गोळा करण्याच्या कामी आपण व आपल्या मार्गदर्शनाखाली सहाय्यभूत झालेल्या सर्व स्तरावरील शासकीय/निमशासकीय सेवकांच्या अविश्रांत परिश्रमामुळे दिनांक ३१.०८.२०१० पर्यंत रूपये १०,५६,६२,६९५/- (७२.५४%) एवढया मोठ्या प्रमाणावर निधी गोळा करणे शक्य झाले आहे. त्यामुळे याद्वारे मी व्यक्तीश: आपले आणि आपल्या नियंत्रणाखाली सर्व अधिका-यांचे व आपल्याला सहकार्य करणा-या अधिका-यांचे/कर्मचा-यांचे अभिनंदन करीत आहे. गेल्या ५ वर्षात मिळविलेल्या या यशाची कमान यापुढील येणा-या वर्षात प्रतिवर्षी उंच राखण्याचा आपण सर्वांनीच प्रयत्न करावयास हवा. कारण माजी सैनिकांच्या आणि त्यांच्या कुटुंबियांच्या पुनर्वसनाच्या अनेक योजना राबविण्यासाठी निधीची नितांत आवश्यकता आहे, आणि माझी खात्री आहे की, या प्रकरणी आपण आपले प्रयत्न उणे पडू देणार नाही.

G:\flag day

३. मे १९९९ पासून, जम्मु-काश्मिरमधील नियंत्रण रेषेजवळ निर्माण झालेल्या युध्दजन्य तणावाची परिस्थिती हाताळताना अथवा देशातील सर्व क्षेत्रात/अंतर्गत सुरक्षा मोहिमेत/चकमकीत धारातीर्थी पडलेल्या सैन्यदलातील तसेच सीमा सुरक्षा बल व इतर तत्सम निमलष्करी दलातील अधिकारी/जवान यांना राज्य शासनातर्फे प्रत्येकी रु.५ लाख आर्थिक मदत दिली जाते. ही एकवेळची आर्थिक मदत शहीद जवानाची विधवा पत्नी, आई/वडील यांच्यामध्ये विभागणी करण्याचा निर्णय घेतलेला आहे. तसेच उपरोक्त कार्यवाहीत अपंगत्व आलेल्या सदरहू दलातील महाराष्ट्रातील अधिकारी/जवानांना त्यांच्या अपंगत्वाचे प्रमाण लक्षात घेऊन रूपये १ लाख किंवा रूपये ३ लाखापर्यंत आर्थिक मदत राज्य शासनातर्फे दिली जाते.

४. ग्रामीण भागात राहणा-या माजी सैनिकांच्या पाल्यांना शिक्षणासाठी शहरांमध्ये जावे लागते. अशा पाल्यांकरिता राज्यात या निधीतून ४६ वसतीगृहे बांधण्यात आली असून यापैकी ३२ मुलांची व १४ मुलींची वसतीगृहे आहेत. सदर वसतीगृहांच्या बांधकामाचा व देखरेखीचा खर्च या निधीतून करण्यात येतो.

५. ध्वजदिन निधी गोळा करण्याचे काम अत्यंत सूत्रबध्द आणि परिणामकारक रीतीने व्हावे, यासाठी जिल्हा स्तरावर जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आलेली असून, प्रत्येक जिल्हयात राबविण्यात येणा-या ध्वजदिन निधी मोहिमेचा नियमितपणे आढावा घेऊन त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी आणि संनियंत्रण ठेवण्यासाठी विभागीय आयुक्तांना सूचना देण्यात आल्या आहेत.

६. निधी गोळा करण्याच्या कामी अत्यल्प निधी देणा-या लहान-सहान देणगीदारांपासून ते मोठया देणगीदारांशी संपर्क ठेवण्याची नितांत गरज आहे. जिल्हयातील प्रत्येक लहान-सहान गटांना निधी गोळा करण्याच्या कामी सामावून घेतले गेल्यावर निधी वाढीस लागतोच शिवाय त्यामुळे जिल्हयातील प्रत्येक कुटुंबात सहभागाची भावना निर्माण होते. याकरिता जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली बैठका घेऊन कार्यक्रमाचे आयोजन करावे आणि निधी गोळा करण्याच्या कामाचा आढावा घ्यावा. जिल्हयातील विविध क्षेत्रातील व्यक्ती आणि संस्था स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याही स्वतंत्रपणे बैठका आयोजित करण्यात याव्यात. यासाठी जिल्हयातील उद्योजकांच्या संघटनांच्या पदाधिका-यांची तसेच व्यापारी, बागायतदार, सहकारी बँकांचे अध्यक्ष किंवा व्यवस्थापक, शैक्षणिक संस्थांचे पदधिकारी, औद्योगिक घटक आणि महत्वाच्या अन्य संघटना यांच्याही बैठका आयोजित करणे फलदायी ठरेल.

७.     विभागीय आयुक्तांनी त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व जिल्हयांमध्ये ध्वजदिन निधी गोळा करण्यासंबंधीच्या कार्यक्रमाचा आढावा दर महिन्यात घ्यावा आणि हे काम प्रत्येक जिल्हयात व्यवस्थित नियोजनबध्द पध्दतीने चालले आहे हे पहावे. तसेच सर्व विभागाच्या सचिवांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रीय कार्यालये, जिल्हा आणि तालुका स्तरावर कार्यालये, महामंडळे, संचालनालये व सार्वजनिक उपक्रम यांना ध्वजदिन निधी संकलनाच्या कार्यक्रमात सहकार्य देण्याच्या सूचना द्याव्यात. ध्वजदिन निधीत द्यावयाचे योगदान हे जिल्हा स्तरावर जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांच्या कार्यालयात "जिल्हाधिकारी व अध्यक्ष, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय" आणि विभागीय स्तरावर "संचालक, सैनिक कल्याण विभाग" यांच्या नावाने धनादेशाद्वारे जमा करण्याबाबत संबधितांना सूचना देण्यात याव्यात.

८.     वरीलप्रमाणे निधी गोळा करताना त्यासाठी शासनाने नेमून दिलेल्या पध्दतीचाच अवलंब व्हावा व कोणत्याही प्रकारे निधी संकलनाच्या कार्यक्रमात गैरप्रकार अथवा अपहार होणार नाही याची पुरेपूर काळजी घेण्यत यावी .

आपला,

(जे. पी. डांगे )

प्रति,

१) सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग.
२) सर्व विभागीय आयुक्त,
३) सर्व जिल्हाधिकारी / सर्व अपर जिल्हाधिकारी,
४) सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
५) सर्व महापालिकांचे आयुक्त.

G:flag day